MHWR130003852026

नि.दि.दावा क्र.७८/२०२६
नारायण कुसरे वि. अरुण डंभारे

## आदेश नि.क्र.१४ खाली

१] वादी यांनी सदरचा अर्ज हा प्रतिवादीविरुध्द जैसे–थे (status-quo) स्थिती मंजूर करण्यासाठी दाखल केलेला आहे.

२] वादीच्या कथनानुसार, वादीच्या घराचे पुर्वेकडे प्रतिवादीचे घर आहे. या दोघांच्या घरामध्ये पुर्वेकडे ४ फुटाची गल्ली आहे. पुर्वी त्या गल्लीमध्ये सांडपाणी वाहून जाण्यासाठी एक गल्ली होती. सदर गल्ली ही वादीची पुर्वीची मालमत्ता होती. वादीचे पुर्वीचे मालक व प्रतिवादी या दोघांनीही २–२ फुट जागा सोडून सांडपाणी वाहून जाण्यासाठी सदरची गल्ली सोडली होती. तसेच दोन्ही घरांमध्ये ४ फुटाचे अंतर असल्यामुळे वादीच्या घराचे पुर्वीचे मालक यांनी त्यांच्या घराचे दोन्ही संडासचे व्हेंटीलेटर तसेच बेडरुम व पॅसेजमध्ये दोन खिडक्या ठेवल्या होत्या, जेणेकरुन त्या जागेतुन त्यांना हवा व प्रकाश येईल. प्रतिवादीने सुध्दा त्याच्या घराच्या पश्चीमेला दोन खिडक्या ठेवल्या आहेत. सदर गल्लीतुन अंडरग्राऊंड संडासची पाईपलाईन निघाली आहे. '*ती गल्लीच वाद मालमत्ता आहे.*

३] प्रतिवादी याने दिनांक १०.०८.२०२६ रोजी सदर वाद गल्लीमध्ये वादीच्या घराच्या भिंतीलगत त्याला कुठलाही कायदेशीर हक्क नसतांना खड्डे खोदण्याचे काम सुरु केले. त्यासंदर्भात वादीने त्यांना थांबविले असता त्यांनी संपूर्ण गल्ली ही त्यांची आहे असे कथन केले. प्रतिवादीने त्यांचे दोन फुटाचे जागेवर वाद गल्लीमध्ये ओटा केला होता, तो ओटा अजुनही आहे. दिनांक

१०.०८.२०२६ रोजी वादीने वाद मालम्मतेवर दोन खड्डे खोदून पी–१ व पी–२ नावाचे दोन पिलर उभे केले.

४] वादीच्या कथनानुसार सदर गल्लीमध्ये जर बांधकाम केले तर वादीच्या घरामध्ये असणाऱ्या दोन्ही खिडक्या बंद होवून जाईल व त्यांना त्यांच्या घरामध्ये हवा व प्रकाश मिळणार नाही. प्रतिवादीला सदर बाबीची कल्पना असून देखील त्यांनी वादीस त्रास देण्याकरीता गैरकायदेशीररित्या काम करण्याकरीता सदरील खोदकाम केले आहे.

५] वादीच्या कथनानुसार, दिनांक १९.०८.२०२६ रोजी न्यायालयाची नोटीस प्राप्त झाल्यानंतर देखील प्रतिवादीने काल दिनांक २०.०८.२०२६ रोजी वाद गल्लीत बांधकाम केले. त्यांच्या कथनानुसार, जर हे बांधकाम पूर्ण झाले तर त्यांच्या खिडकीतुन हवा व प्रकाश येण्यास बाधा येईल. तसेच घरात खेळती हवा राहणार नाही व त्याचा परिणाम वादी व त्यांच्या कुटुंबांच्या प्रकृतीवर पडेल.

६] सदरील अर्ज हा प्रतिवादीच्या म्हणण्याकरीता ठेवण्यात आला होता. प्रतिवादीने वकील साहेबांची नियुक्ती होईपर्यंत वेळ मिळण्याकरीताचा अर्ज नि.क्र.११ वर दाखल केला आहे.

७] वादीने त्याच्या कथनाच्या समर्थनार्थ अभिलेखावर त्यांच्या नावे केलेल्या घराच्या विक्रीपत्राची प्रत तसेच त्यांच्या नावे असलेला ७/१२ उतारा, नमुना ८–अ तसेच त्यांनी नगर पालिका आर्वी येथे त्यांचा प्लॉट हा त्यांच्या नावे करुन देण्यासंदर्भातील केलेला अर्ज, दिनांक १८.०८.२०२६ रोजी बांधकामाची परिस्थीती दाखविणारे छायाचित्र तसेच आजच्या तारखेमध्ये वाढलेल्या बांधकामाच्या छायाचित्राच्या प्रती अभिलेखावर दाखल केलेल्या आहेत. प्रतिवादी

यांना सदरील बांधकामासंदर्भात विचारणा केली असता प्रतिवादी यांनी त्यांचे वकील लागेपर्यंत कुठलेही कथन करणार नाही असे सांगीतले.

८] अभिलेखावरील एकंदरीत परीस्थीती बघता तसेच वादीचे वकील व प्रतिवादी यांच्या म्हणण्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वाद मालमत्तेवरील बांधकाम हे सुरु आहे. दावा दाखल केला त्या दिवशीच्या छयाचित्रामध्ये तसेच आज दाखल केलेलया छायाचित्रामधील बांधकामामध्ये प्रगती दिसून येत आहे. तसेच वादी व प्रतिवादी यांच्या घराच्या भिंतीला लागून असलेल्या खिडक्या देखील त्या छायाचित्रांमध्ये दिसून येत आहे. भिंत उभी केल्यास खिडक्यांमधुन प्रकाश व हवा येण्यास अडथळा निर्माण होवू शकतो . यावरुन सद्यस्थितीमध्ये प्रथमदर्शनी हे प्रकरण वादीच्या बाजुने असल्याचे दिसून येते.

९] दिनांक २२.०८.२०२६ तसेच २३.०८.२०२६ शासकीय सुट्टी आहे जर या कालावधीमध्ये भिंतीचे बांधकाम पुर्ण झाले तर वादीच्या संडासाची खिडकी तसेच गल्लीमधील इतर दोन खिडक्यामार्फत येणारी खेळती मोकळी हवा व प्रकाश फिरणार नाही. त्यामुळे वादी यांचे नुकसान होईल असे दिसून येते. याऊलट सदयसिथीतीत सदर बांधकाम थांबविल्यास प्रतिवादी यांना कुठलेही नुकसान होईल असे दिसून येत नाही. त्यामुळे या क्षणी सदरील अर्ज हा वादीच्या बाजुने मान्य करणे न्यायोचित होईल असे न्यायालयास वाटते. त्यामुळे हे न्यायालय खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१] अर्ज नि.क्र.१४ मंजुर करण्यात येतो.

२] प्रतिवादी यांना आदेशीत करण्यात येते की, प्रतिवादी, त्यांचे अभिकर्ता (एजंट) किंवा त्यांच्या वतीने कोणतीही व्यक्ती, यांना मनाई हुकुमाच्या अर्जावर उत्तर दाखल होईपर्यंत वाद मालमत्तेवर कोणतेही बांधकाम करण्यापासून प्रतिबंधित करण्यात येत आहे.

३] दोन्ही पक्षांनी याची नोंद घ्यावी.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित)

MRUNAL GAJENDRA HINGANGHATE
Digitally signed by MRUNAL GAJENDRA HINGANGHATE
Date: 2026.08.21 17:05:08 +0530

**(एम.जी.हिंगणघाटे)**

दिनांक :२१.०८.२०२६

सह दि.न्या.क.स्तर, आर्वी
प्र.२रे सह दि.न्या.क.स्तर, आर्वी.

Noted.
A. K Dambhare
21/08/2026
प्रतिवादी.

Noted
N. N. Kusare
21/08/2026
वादी.